'उप अभियंता (वाहतूक नियोजन)' या पदाची
दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती
सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्र.साप्रवि/१२/कावि/८२४/२०२४
दिनांक १०/१२/२०२४

वाचले क्र. १) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/०६/२०२१
२) नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२०/प्र.क्र.३६१/नवि-२२ दि.०१/०२/२०२१
३) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि.२९/८/२०१३
४) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/७४/२०२१ दि. २८/०१/२०२१
५) सामान्य प्रशासन विभागाकडील दि. १० /१२ /२०२४ चा मान्य प्रस्ताव

**आदेश**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर **'उप अभियंता (वाहतूक नियोजन)'** पदावर दि.२३/११/२०२१ ते दि.३१/१२/२०२३ या कालावधीत नियमित नियुक्त, पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यानुसार –

१) दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतायादीमधील नमुद अधिकाऱ्यांनी स्वत:चे नावाबावत, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा ज्येष्ठतायादीमध्ये नाव नसलेबावत काही आक्षेप असल्यास त्याबाबत आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती ज्येष्ठतायादी प्रसिध्द झाल्यापासुन १५ **दिवसाचे** आत संबंधित शाखाप्रमुखांच्या शिफारसीसह सामान्य प्रशासन विभागात योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.

२) आक्षेपासंदर्भातील योग्य ते पुरावे सत्यप्रती करुन सादर न केल्यास व निश्चित केलेल्या १५ दिवसांचे मुदतीत आक्षेप सामान्य प्रशासन विभागात प्राप्त न झाल्यास सदरचे आक्षेप फेटाळण्यात येतील. तसेच दप्तरी दाखल केले जातील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

३) सर्व शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की, ही तात्पुरती ज्येष्ठतायादी त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावुन त्यांना प्रत मिळालेबाबत दिनांकीत **स्वाक्षांकित पोहोच ८ दिवसाचे आत** सामान्य प्रशासन विभागास सादर करावी. तसेच त्यांनी सदर ज्येष्ठतायादी त्यांच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करावी.

४) संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारसीसह / अभिप्रायासह व अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा करूनच आवश्यकता असल्यास सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रती करून मुदतीत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे.

५) तात्पुरती ज्येष्ठतायादी प्राप्तच झाली नाही, किंवा मुदतीत आक्षेप सादर करूनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप सामान्य प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील.

६) या तात्पुरती सेवाज्येष्ठतायादीत काही वास्तविक चुका असल्यास उदा. नाव समाविष्ट नसणे, आडनावात/ आद्याक्षरात/ जन्मतारखेत चुका आढळुन आल्यास त्या शाखाप्रमुखांनी निदर्शनास आणाव्यात, म्हणजे ज्येष्ठतायादी अंतिम करताना त्या दुरूस्त करण्यात येतील.

७) तात्पुरती ज्येष्ठतायादी वाचले क्र. १ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम २०२१ दि.२१ जुन २०२१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तयार केली आहे.

८) तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी मे.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या सेवाज्येष्ठतायादीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

प्रत:- संबंधित विभाग
२/- सदर आदेश व सेवाज्येष्ठतायादी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

D:\drive E\sevajestata\2024\वर्ग 2\उप अभियंता (वाहतूक नियोजन)\प्राथमिक आदेश वर्ग 2 2024.doc1

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

उप अभियंता (वाहतूक नियोजन) पदाची दि.01/01/2024 रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी

पे लेवल :- S-20 वेतनश्रेणी :- 56100 - 177500

| अ.क्र. | संगणक क्र. | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | उप अभियंता (वाहतूक नियोजन) पदावरील रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नती/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्त दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 7369 | पवार सुनिल प्रभाकर | भटक्या जमाती (ब) | डी.सी.ई. | 31/10/1974 | 28/12/2021 | पदोन्नती | स्था. अभि. सहाय्यक | 22/09/1998 | 31/10/2032 | |
| 2 | 10554 | भोसले अभिमान अरुण | अनुसुचित जाती | बी.ई.(सिव्हील) | 28/01/1982 | 07/07/2022 | सरळसेवा | कनिष्ठ अभि., स्थापत्य | 20/10/2012 | 31/01/2040 | |

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.